लोकमत

# "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेअंतर्गत प्रस्तावित आराखडा सन २०२५-२६ करिता लाभार्थी निवडीसाठी अर्ज/प्रस्ताव मागविणेसाठी जाहिरात.

## (आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई)

महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्ह्यांतील १९२ तालुक्यांमधील ४९७५ गावांचा "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेत समावेश आहे. सदरची सहयोजना राज्यात सन २०२४-२५ ते २०२८-२९ या ५ वर्ष कालावधीसाठी अनुसूचित जमाती या प्रवर्गाकरिता राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या गावातील अनुसूचित जमाती या प्रवर्गाकरिताच योजना राबविण्याचे केंद्र शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार केंद्र व राज्य शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या व जाहिरातीमध्ये अंतर्भुत असलेल्या लाभार्थीभिमुख २५ घटकांसाठी लाभार्थी निवड करण्याकरिता निश्चित केलेल्या गावातील पात्र अर्जदारांकडूनच अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जासोबत सविस्तर प्रकल्प अहवाल व आवश्यक कागदपत्रे याची पूर्तता करणे आवश्यक राहील.

संकेतस्थळांचा तपशील :

- "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेचा तपशील खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
  https://fisheries.maharashtra.gov.in/ व https://tribal.nic.in/dajagua.aspx
- "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेअंतर्गत राज्यासाठी केंद्राकडून निश्चित केलेल्या गावांची यादी खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
  https://fisheries.maharashtra.gov.in/
- **अटी व शर्ती :**

१. अनुसुचित जमाती या प्रवर्गातील इच्छुकांनी अर्ज करावा.
२. "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेअंतर्गत लाभार्थी निवडीसाठी प्राधान्य द्यावयाचे क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.
   a. आदिवासी वन पट्टाधारक/आदिवासी सामूहिक वन संसाधन धारक.
   b. आकांक्षित तालुक्यातील आदिवासी गावातील अनुसुचित जमातीचे लाभार्थी.
   c. आदिवासी जमात लोकसंख्या प्रभावित परंतु अविकसित क्षेत्र.
   d. आदिवासी बाहुल्य गाव जेथे किमान ५०० लोकसंख्या आणि ५० टक्के अथवा त्यापेक्षा अधिक आदिवासी जातीची लोकसंख्या.
३. अर्जदाराने विहित NFDB च्या नमुन्यातील अर्ज, हमीपत्र नमुना व सविस्तर प्रकल्प अहवालाचा (DPR) नमुना जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) यांचे कार्यालयातून प्राप्त करून घ्यावा.
४. अर्ज/प्रस्ताव सादर करताना काही अडचणी असल्यास, संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याशी संपर्क साधावा.
५. अर्जदाराने अर्जासोबत प्रकल्प अहवाल, आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक खात्याचा तपशील, जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity), फोटो, रहिवाशी दाखला, आवश्यक ठिकाणी जागेचे कागदपत्रे इ. जोडणे आवश्यक आहे. (कागदपत्राच्या मूळ प्रती आवश्यकतेनुसार पडताळणीकरिता उपलब्ध करणे बंधनकारक राहील)
६. अर्जदाराने परिपूर्ण अर्ज, प्रकल्प अहवाल व सर्व कागदपत्रे स्वस्वाक्षांकित (Self attested) करून संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास ४ प्रतीत सादर करावे.
७. आवश्यक ठिकाणी प्रकल्पासाठी लागणारी जमीन स्वतःच्या मालकीची नसल्यास, "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेच्या अटी व शर्तीनुसार प्रकल्प मंजूर झाल्यानंतर नोंदणीकृत भाडेकरार सादर करणे बंधनकारक राहील.
८. लाभार्थी हिस्सा स्वनिधीतून अथवा बँकेमार्फत उभारणार याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. प्रकल्प मंजुरीपूर्वी प्रस्तावामध्ये प्रकल्प उभारणीचे प्रस्तावित आहे त्या जागेचे जागा वापराबाबत नोटरी केलेले करारपत्र आवश्यक आहे.
९. अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर आलेल्या प्रस्तावांची संख्या कार्यक्रमातील प्रकल्प संख्येच्या लक्षांकापेक्षा जास्त असल्यास, लकी ड्रॉ पद्धतीने प्रकल्प मंजुरीसाठी लाभार्थींची निवड करण्यात येईल.
१०. अर्जदारास मंजूर झालेल्या प्रकल्पासंबंधीचे आवश्यक प्रशिक्षण ICAR संस्था, मत्स्यसेवा केंद्र यांच्याकडून घेणे आवश्यक आहे.
११. घटकनिहाय लाभार्थी पात्रता बाबतचे निकष "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" चे मार्गदर्शक सूचना (जानेवारी २०२५), दि.४.९.२०२५ चे शासन निर्णय व वेळोवेळी शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.
१२. अर्जदाराने आपले परिपूर्ण अर्ज दि.२२.१२.२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत संबंधित जिल्हा सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयामध्ये ४ प्रतीत सादर करावे.
१३. या सहयोजनेंतर्गत अनुदानाचे प्रमाण ९०% (केंद्र हिस्सा -५४% व राज्य हिस्सा -३६%) आहे.
१४. "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA)" या सहयोजनेच्या लाभार्थी निवडीसाठी खालील प्रमाणे कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | कालमर्यादा |
|---|---|---|
| १. | अर्ज प्राप्त करून घेण्याची अंतिम तारीख | दि.२२.१२.२०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत |
| २. | जिल्हा कार्यालयाकडून अर्जाची छाननी व अर्जदारास त्रुटीबाबत लेखी कळविणे. | दि.०२.०१.२०२६ पर्यंत |
| ३. | जिल्हा कार्यालयाकडून कळविल्यानुसार, अर्जदाराने त्रुटीची पूर्तता करावी. | दि.०८.०१.२०२६ पर्यंत |
| ४. | जिल्हा कार्यालयाकडून परिपूर्ण प्रस्तावांचे वर्गीकरण करून, विहित नमुन्यात माहिती तयार करणे. | दि.१५.०१.२०२६ पर्यंत |
| ५. | जिल्हा कार्यालयाने परिपूर्ण प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे. | दि.२३.०१.२०२६ पर्यंत |
| ६. | जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीने परिपूर्ण प्रस्ताव मुख्य कार्यालयास सादर करणे. | दि.३०.०१.२०२६ पर्यंत |

**घटकांची सविस्तर माहिती :-**

| अ. क्र. | योजनेचा कोड | उप-घटक व उपक्रम | प्रवर्ग | परिमाण | (रु.लाखात) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रकल्प किंमत | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | लाभार्थी हिस्सा |
| १ | १.१ | गोड्यापाण्यातील मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थानना | अनुसुचित जमाती | (संख्या) | २५ | १३.५० | ९.०० | २.५० |
| २ | १.२ | नवीन मत्स्यबीज संवर्धन तलाव बांधकाम (Nursery/seed rearing pond) | अनुसुचित जमाती | (हे) | ७.० | ३.७८ | २.५२ | ०.७० |
| 3 | १.३ | नवीन मत्स्य संगोपन तलाव बांधकाम | अनुसुचित जमाती | (हे) | ७.० | ३.७८ | २.५२ | ०.७० |
| ४ | १.४ | मत्स्य, कोळंबी, पंगेशियस, तिलापिया इत्यादी संवर्धनाकरिता निविष्ठा अनुदान | अनुसुचित जमाती | (हे) | ४.० | २.१६ | १.४४ | ०.४० |
| ५ | १.५ | निमखारेपाणी मत्स्यसंवर्धनाकरिता नवीन तळी बांधकाम | अनुसुचित जमाती | (हे) | ८.० | ४.३२ | २.८८ | ०.८० |
| ६ | १.६ | क्षारयुक्त (Saline/Alkaline) क्षेत्रामध्ये नवीन तलाव बांधकाम | अनुसुचित जमाती | (हे) | ८.० | ४.३२ | २.८८ | ०.८० |
| ७ | १.७ | निमखारे मत्स्यसंवर्धन अंतर्गत निविष्ठा अनुदान | अनुसुचित जमाती | (हे) | ६.० | ३.२४ | २.१६ | ०.६० |
| ८ | १.८ | क्षारयुक्त (Saline/Alkaline) क्षेत्रातील तलावांकरिता निविष्ठा अनुदान | अनुसुचित जमाती | (हे) | ६.० | ३.२४ | २.१६ | ०.६० |
| ९ | १.९ | निमखारेपाणी/क्षारयुक्त क्षेत्रामध्ये (Saline/Alkaline) बायोफ्लॉक तळी उभारणी रु. ८.०० लक्ष प्रति एकक निविष्ठा खर्चासह | अनुसुचित जमाती | ०.१ (हे) | १८.० | ९.७२ | ६.४८ | १.८० |
| १० | १.१० | भुजलाशयीन क्षेत्रामध्ये बायोफ्लॉक तळी उभारणी रु. ४.०० लक्ष प्रति एकक निविष्ठा खर्चासह | अनुसुचित जमाती | ०.१ (हे) | १४.० | ७.५६ | ५.०४ | १.४० |
| ११ | ४.१ | परसबागेतील लघु आकारातील शोभिवंत मत्स्यप्रजाती संगोपन /संवर्धन प्रकल्प (सागरी व गोड्या पाण्यातील शोभिवंत मत्स्य प्रजातींकरिता) | अनुसुचित जमाती | (संख्या) | ३.० | १.६२ | १.०८ | ०.३० |
| १२ | ४.२ | मध्यम आकारातील शोभिवंत मत्स्यप्रजाती संगोपन /संवर्धन प्रकल्प (सागरी व गोड्या पाण्यातील शोभवंत मत्स्य प्रजातींकरिता) | अनुसुचित जमाती | (संख्या) | ८.० | ४.३२ | २.८८ | ०.८० |
| १३ | ५.१ | मध्यम आकारचे RAS पाणी पुनः वापर मत्स्यपालन प्रणालीची स्थापना ६ टाक्या (कमीत कमी ३० घनमीटर प्रती टाकी, क्षमता १० टन/पीक) | अनुसुचित जमाती | (संख्या) | २५.० | १३.५० | ९.०० | २.५० |
| | ५.१ | मध्यम आकारचे बायोफ्लॉक (४ मी व्यास असलेले २५ टाक्या व १.५ मी उंची) संवर्धन प्रणाली | अनुसुचित जमाती | (संख्या) | २५.० | १३.५० | ९.०० | २.५० |
| १४ | ५.२ | लहान आकारचे RAS पाणी पुनः वापर मत्स्यपालन प्रणालीची स्थापना (१०० घनमीटर क्षमतेची १ टाकी) | अनुसुचित जमाती | (संख्या) | ७.५ | ४.०५ | २.७० | ०.७५ |
| | ५.२ | लहान आकारचे बायोफ्लॉक (४ मी व्यास असलेले ७ टाक्या व १.५० मी उंची) संवर्धन प्रणाली | अनुसुचित जमाती | (संख्या) | ७.५ | ४.०५ | २.७० | ०.७५ |
| १५ | ५.३ | घरामागील अंगणात मिनी आकाराचे RAS पाणी पुनःवापर मत्स्यपालन प्रणालीची स्थापना | अनुसुचित जमाती | (संख्या) | ०.५ | ०.२७ | ०.१८ | ०.०५ |
| १६ | ५.५ | भूजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्प उभारणी (वैयक्तिक लाभार्थीस कमाल १८ पिंजरे/१८०० घ.मी. व मच्छीमार संस्था/गट/समूह यांस ७२ पिंजरे/७२०० घ.मी.) | अनुसुचित जमाती | (संख्या) | ३.० | १.६२ | १.०८ | ०,३० |
| १७ | ६.१ | १० टन क्षमता शीतगृह/बर्फ कारखाना उभारणी | अनुसुचित जमाती | (संख्या) | ४०.० | २१.६० | १४.४० | ४.०० |
| १८ | ६.२ | रेफ्रिजरेटेड वाहन | अनुसुचित जमाती | (संख्या) | २५.० | १३.५० | ९.०० | २.५० |
| १९ | ६.३ | इंन्सुलेटेड वाहन | अनुसुचित जमाती | (संख्या) | २०.० | १०.८० | ७.२० | २.०० |
| २० | ६.४ | मोटार सायकलसह शीतपेटी | अनुसुचित जमाती | (संख्या) | ०.७५ | ०.४१ | ०.२७ | ०.०८ |
| २१ | ६.६ | तीन चाकीसह शीतपेटी, ई-रिक्षासह- मासे विक्रीकरीता | अनुसुचित जमाती | (संख्या) | ३.०० | १.६२ | १.०८ | ०.३० |
| २२ | ६.७ | जिवंत मासळी विक्री केंद्र (स्थिर/फिरते किंवा दोन्ही प्रकारचे) | अनुसुचित जमाती | (संख्या) | २०.० | १०.८० | ७.२० | २.०० |
| २३ | ६.८ | लघु मत्स्यखाद्य कारखाना- क्षमता २ टन/दिवस | अनुसुचित जमाती | (संख्या) | ३०.० | १६.२० | १०.८० | ३,०० |
| २४ | ७.१ | मासे विक्री केंद्राचे बांधकाम (Fish, Kiosks) शोभिवंत मासे विक्रीसह | अनुसुचित जमाती | (संख्या) | १०.० | ५.४० | ३.६० | १,०० |
| २५ | ९.२ | पारंपारिक मच्छीमारांना मासेमारी नौका (बदली) व जाळे पुरवठा करणे. | अनुसुचित जमाती | (संख्या) | ५.० | २.७० | १.८० | ०.५० |

**संपर्क करण्याकरिता प्रादेशिक कार्यालयाचे अधिकारी :-**

| अ. क्र. | प्रादेशिक विभाग | प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई विभाग | श्री. एन.वी.भादुले | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ९४२३५४२९५४ |
| २ | नाशिक विभाग | श्री. एन.वी.भादुले | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ९४२३५४२९५४ |
| ३ | पुणे विभाग | श्री. संदीप दप्तरदार | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ९८५०६७१३०९ |
| ४ | छ. संभाजीनगर विभाग | श्री. एस.आर. भारती | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ८८८८८८३५७० |
| ५ | लातूर विभाग | श्री. शिरीष गाताडे | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ८८५०६८२४७९ |
| ६ | अमरावती विभाग | श्री. एम.एम. मेश्राम | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ७५८८७७२६१६ |
| ७ | नागपूर विभाग | श्री. सुनील जांभुळे | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय | ९४२२८०२२४७ |

**मुख्य कार्यालयाचे संपर्क अधिकारी**

१. श्री. यु.आ.चौगले, सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई
मो. नं. ७०२१०२३०९४/८०८२६०१०८५
२. श्री. सचिन भालेराव, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा.
मो. नं. ९९२०२९१२३७
Email: pmmsymaharashtra@gmail.com

[DGIPR-2025-26/ क्र.5/C-4109]

स्वा/-
(किशोर तावडे भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.